<u>नियमीत दिवाणी दावा क्र. ९९/२०२१ मधील निशाणी क्र.२४ वरील आदेश</u>

प्रस्तूतचा अर्ज प्रतिवादी याने त्याचेविरुद्ध पारीत झालेला "विना कैफियत" चा आदेश रद्द होवून, कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ होवून मिळण्यासाठी व कैफियत दाखल करण्यासाठी परवानगी मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२. अर्ज व त्यावरील वादीचे म्हणणे वाचले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

३. प्रतिवादींनी असे कथन केले की, आवश्यक ती कागदपत्रे वेळेत उपलब्ध न झाल्याने मुदतीत कैफियत दाखल करता आली नाही. कोव्हीड–१९ या संसर्गजन्य रोगामुळे संपूर्ण देशात टाळेबंदी असल्याने शासकीय कार्यालयातून आवश्यक ती कागदपत्रे उपलब्ध झाली नाहीत. तसेच न्यायालयामध्ये सुद्धा अत्यंत महत्वाची कामे चालत असल्यामुळे प्रतिवादींना न्यायालयात हजर राहून वेळेत कैफियत दाखल करता आली नाही. त्यांना कैफियत दाखल करण्यास २४ दिवसांचा विलंब झालेला आहे. या कारणाने त्यांनी अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

४. वादीने अर्जास म्हणणे देवून खर्चाचे अटीवर अर्ज मंजूर करण्यास हरकत नाही असे कथन केले आहे.

५. बेलिफ अहवालानुसार (निशाणी २१) दिनांक ११.०५.२०२१ रोजी दावा समन्सची प्रतिवादीवर बजावणी झाली आहे. प्रस्तुतकामी प्रतिवादी विरुद्ध दिनांक ०८.०९.२०२१ रोजी विना कैफियत हा आदेश पारीत झालेला आहे. त्यानंतर प्रतिवादी हजर झाले आणि त्यांनी प्रस्तुतचा विचाराधीन असलेला अर्ज दाखल केला आहे. प्रस्तुतचा दावा वादीने मनाई हुकूमाकरीता व अतिक्रमण काढून मिळणेकरीता दाखल केलेला आहे. प्रतिवादीने कैफियत दाखल करण्यास २४ दिवसांचा विलंब केलेला आहे. प्रस्तुत प्रकरणात अद्याप वादीतर्फे पुरावा देण्यात आलेला नाही. अशा वेळी प्रतिवादीला कैफियत दाखल करण्यास संधी देणे आवश्यक आहे. प्रतिवादीला कैफियत दाखल करण्यास संधी न दिल्यास त्याचे कधीही न

भरुन येणारे असे नुकसान होईल. तसेच वादी व प्रतिवादी यांचेमधील वाद प्रश्नांचा निपटारा करणेकरीता व दाव्याचा गुणावगुणावर निर्णय देणेकरीता प्रतिवादीला कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यात येवून कैफियत दाखल करण्यास संधी देणे गरजेचे आहे. त्यामुळे मी पुढील आदेश पारीत करतो.

## आ दे श

१) निशाणी क्र.२४ कडील अर्ज मंजूर करण्यात येतो.

२) प्रतिवादीला कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यात येवून कैफियत दाखल करण्यास परवानगी देण्यात येते.

ठिकाण – वडूज
दिनांक – १५.०३.२०२२

(के. सी. माने)
दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, वडूज